Pune Municipal Corporation,
Pune.

Pune, 19th January 2016.

---

## पुणे महानगरपालिका, पुणे

*जाहीर प्रकटन*

क्रमांक मावजसंका/१३९३/२०१६.--मे. उच्च न्यायालय मुंबई येथील रिट पिटीशन क्रमांक ११८४८/२०१३ मधील दिनांक ९ सप्टेंबर २०१५ रोजीचे निकालानुसार पुणे पेठ धनकवडी सर्व्हे नंबर २९/१/२/४, चैतन्य नगर येथील मिळकतीच्या ओपन स्पेसवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर नियोजन अधिनियम, १९६६ चे कलम ३७ *(१)* अन्वये उद्यान आरक्षित करणेची कार्यवाही करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

यास अनुसरून मा. महानगपालिका सभा ठराव क्रमांक ६५१, दिनांक १८ डिसेंबर २०१५ नुसार उद्यान आरक्षित करणेची कार्यवाहीसाठी जाहीर प्रकटन देणेस मान्यता प्राप्त झालेली आहे. या ठरावानुसार खालीलप्रमाणे परिशिष्ट-१ नुसार उक्त नवीन समाविष्ट गावाच्या विकास आराखड्यापैकी प्लॅनिंग युनिट क्रमांक ५ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम ॲक्ट १९६६ चे कलम ३७ *(१)* नुसार उद्यान आरक्षित करण्याचा पुणे महानगरपालिका विचार करीत आहे.

### परिशिष्ट-१

पुणे महानगरपालिका नवीन समाविष्ट गावांचे मंजूर विकास आराखड्यापैकी प्लॅनिंग युनिट क्रमांक ५ मधील धनकवडी सर्व्हे नंबर २९/१/२/४, चैतन्यनगर येथील भूअभिन्यासातील मोकळी जागा उपलब्ध आहे. सदर जागेवर उद्यानाचे आरक्षण टाकणेबाबत मे. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन क्रमांक ११८४८/२०१३ मध्ये दिनांक ९ सप्टेंबर २०१५ रोजी आदेश प्राप्त झालेले आहेत. मान्य विकास आराखड्यानुसार सदर भागात नागरिकांकरिता सार्वजनिक उद्यानाचे आरक्षण नाही. त्यामुळे या भागात राहणाऱ्या नागरिकांचे हितासाठी मे. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार व मा. महापालिकेस ठराव क्रमांक ६५१, दिनांक १८ डिसेंबर २०१५ अन्वये ८०००.०० चौ. मी. जागा उद्यानासाठी आरक्षित करण्याचे प्रयोजन आहे.

उपरोक्तप्रमाणे परिशिष्ट-१ अनुसार पुणे महानगरपालिकेच्या नवीन समाविष्ट गावांचे मंजूर विकास आराखड्यापैकी प्लॅनिंग युनिट क्रमांक ५ मध्ये मौजे धनकवडी सर्व्हे नंबर २९/१/२/४ चैतन्यनगर येथील भूअभिन्यासातील मोकळ्या जागेवर (ओपन स्पेस) उद्यान आरक्षण टाकणेकरिता नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत. नागरिकांनी त्यांच्या हरकती व सूचना मा. शहर अभियंता, पुणे महानगरपालिका, बांधकाम विकास विभाग कार्यालय, महापालिका भवन, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ येथे लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस (३०) दिवसांच्या आत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचाच विचार केला जाईल.

**कुणाल कुमार,**
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका, पुणे.

पुणे, १९ जानेवारी २०१६.

---

## PUNE MUNICIPAL CORPORATION

क्रमांक मावजसंका/१३९३/२०१६.— Whereas the General Body of the Pune Municipal Corporation *vide* its Resolution No. 651, dated 18th December 2015 granted permission to Reserved the 8000.00 sq. mtrs. open space at Dhankawadi, S. No. 29/1/2/4, Chaitanyanagar for garden as per the Mumbai High Corut Order, dated 9th September 2015 in Writ Petition No. 11848/2013. As per the above said Resolution Pune Municipal Corporation intends to make the following minor modification in the approved Development Plan for the newly merged villages, Planning Unit No. 5 regarding reservation of land in Dhankawadi S. No. 29/1/2/4, Chaitanyanagar for garden as per the Appendix-1 below.—

### Appendix-1

It is hereby proposed to reserved the land admeasuring 8000.00 sq. mtrs. shown as open space of sanctioned layout of Chaitanyanagar in Survey Number 29/1/2/4, village Dhankawadi. The Development Plan for Planning Unit No. 5 which includes Dhankawadi has been approved by the State Government. The above modification has been proposed as per the order of the Honourable High Court in the Writ Pettion Number 11848/2013 and as per the Resolution number 651, dated 18th December 2015 passed by the General Body of Pune Municipal Corporation.

Pune Municipal Corporation invites suggestions and objections in writing from any person with respect to the proposed modification in the approved Development Plan of Planning Unit No. 5. The objections and suggestions shall be submitted to the office of the City Engineer, First floor, PMC main building, Shivajinagar, Pune-411 005 within period of Thirty (30) days

from the date of publication of this notice. Objections/suggestions received after the said period will not be considered.

**KUNAL KUMAR,**
Municipal Commissioner,
Pune Municipal Corporation,
Pune.

Pune, 19th January 2016.

---

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त यांजकडून

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११ ०१८

*महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल.*

### *सूचना*

क्रमांक नरवि/कावि-१३/१४६/२०१५.--ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८०५/१०५०/प्र. क्र. ७९५/०५/नवि-१३, दिनांक ३० मे २००८ अन्वये व महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८०८/८९४/प्र. क्र. १७२७/नवि-१३, दिनांक १८ ऑगस्ट २००९ अन्वये भागशः मंजूर आहे आणि ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका वाढीव हद्द वगळलेल्या भागाची विकास योजना (ईपी क्रमांक १ ते ११८) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१८१२/१६०/प्र. क्र. ५८/१२/पुनर्बांधणी क्रमांक २७/१२/ईपी मंजुरी/नवि-१३, दिनांक २ मार्च २०१५ अन्वये मंजूर आहे (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली);

आणि, ज्याअर्थी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने मा. महापालिका सभा ठराव क्रमांक १२०२, दिनांक २० ऑक्टोबर २०११ नुसार मौजे चोविसावाडी व मौजे चऱ्होली येथील पुणे आळंदी रस्त्यापासून (चऱ्होली फाटा) ते चऱ्होली गावाकडे जाणारा ३०.०० मीटर रस्ता (नवीन सर्व्हे नंबर ५३४ पर्यंत) व मौजे चऱ्होली येथील नवीन सर्व्हे नंबर ५१७ पैकी ते नवीन सर्व्हे नंबर ५४१ पैकी मधील नियोजित ३०.०० मीटर रस्ता ४५.०० मीटर रुंदीचा करण्यास व त्यालगतच्या आरक्षणांच्या हद्दीत (मौजे चोविसावाडी येथील आरक्षण क्रमांक २/११-अग्निशामक केंद्र, आरक्षण क्रमांक २/१३-टेलिकॉम सेंटर, आरक्षण क्रमांक २/२१-शॉपिंग सेंटर कम मार्केट, आरक्षण क्रमांक २/२२-वाहनतळ, आरक्षण क्रमांक २/२३-रिटेल मार्केट, तसेच मौजे चऱ्होली येथील आरक्षण क्रमांक २/७३-प्राथमिक शाळा, आरक्षण क्रमांक २/६१-जकात नाका, आरक्षण क्रमांक २/६२-कॅटल शेड या आरक्षणाचे हद्दीत) फेरबदल करण्यास व तसेच मौजे मोशी व डुडूळगाव शिवेवरील १८.०० मीटर रस्ता ३०.०० मीटर रुंदीचा करण्याविषयी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे (यापुढे "उक्त अधिनियम" म्हणून संबोधित केला आहे) कलम ३७ अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास पत्र क्रमांक नरवि/कावि-१२/६७/१३, दिनांक १० नोव्हेंबर २०१३ अन्वये मंजुरीस्तव सादर केला आहे (यापुढे "शासनास सादर फेरबदल प्रस्ताव" असा उल्लेख केलेला);

आणि, ज्याअर्थी, आता पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महापालिका सभेने ठराव क्रमांक ६९७, दिनांक २० मे २०१५ अन्वये उक्त विकास योजनेतील मौजे चऱ्होली येथील शासनास सादर फेरबदल प्रस्तावातील आरक्षण क्रमांक २/७३-प्राथमिक शाळा या आरक्षणाचे वाढीव १६६० चौ. मी. क्षेत्र (सोबतचे भाग नकाशावर "ABCD" नुसार दर्शविल्याप्रमाणे) नामंजूर करण्यास शासनास प्रस्ताव सादर करण्यास व उक्त विकास योजनेतील आरक्षण क्रमांक २/७३-प्राथमिक शाळा आरक्षणाचे शासनास सादर फेरबदल प्रस्तावातील ४५.०० मीटर रस्त्यालगतचे उर्वरित २३४० चौ. मी. क्षेत्र (सोबतचे भाग नकाशावर "CDEF" नुसार दर्शविल्याप्रमाणे) उक्त अधिनियमाचे कलम ३७ अन्वये रद्द करण्याबाबत वैधानिक कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे (यापुढे "उक्त ठराव" म्हणून संबोधिलेला);

आणि ज्याअर्थी, मौजे चऱ्होली येथील सर्व्हे नंबर १००४ पैकी व सर्व्हे नंबर १००५ पैकी मधील शासनास सादर फेरबदल प्रस्तावातील ४५.०० मीटर रस्त्यालगतचे सुमारे २३४० चौ. मी. क्षेत्राची (सोबतचे भाग नकाशावर "CDFE" नुसार दर्शविल्याप्रमाणे) जमीन उक्त विकास योजनेत आरक्षण क्रमांक २/७३ अन्वये प्राथमिक शाळा या प्रयोजनाचे आरक्षणातील आहे (यापुढे "उक्त जमीन" म्हणून संबोधित केलेली);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेतील आरक्षण क्रमांक २/७३-प्राथमिक शाळा या प्रयोजनाचे उक्त जमिनीतील आरक्षित क्षेत्र उक्त ठरावानुसार आरक्षणातून वगळून सभोवतालच्या जमीन वापरानुसार रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम ३७ प्रमाणे फेरबदलाची कार्यवाही करण्याचे योजिले आहे (यापुढे "उक्त फेरबदल प्रस्ताव" म्हणून संबोधित केलेला);

आणि त्याअर्थी, उक्त फेरबदल प्रस्ताव दर्शक नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ उपसंचालक, नगर रचना, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११ ०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत ठेवण्यात आलेला आहे.

उक्त फेरबदलाबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असतील तर त्या, सदरची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लेखी स्वरूपात आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११ ०१८ यांच्या कार्यालयाकडे पाठवाव्यात.

उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत विहित मुदतीमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाकडे प्राप्त झालेल्या हरकती/सूचनांचा विचार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करण्यापूर्वी केला जाईल.

**राजीव जाधव,**
आयुक्त,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-४११ ०१८.

पिंपरी, २ डिसेंबर २०१५.

---

## PIMPRI-CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION, PIMPRI, PUNE-411 018

*Modification under Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.*

***Notice***

No. TPS/WS-13/146/2015.–Whereas, the Development Plan for the extended limits of Pimpri-Chinchwad Municipal Corporation has been sanctioned in parts by the Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* Notification No. TPS-1805/1050/CR-795/05/ UD-13, dated 30th May 2008 and also by the Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* Notification No. TPS-1808/894/CR-1727/UD-13, dated 18th August 2009. And whereas, the Development Plan of Excluded Part of the extended limits (EP Nos. 1 to 118) has been sanctioned by the Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* Notification No. TPS-1812/160/ CR-58/12/Reconstruction No. 27/12/EP sanction/ UD-13, dated 2nd March 2015 (hereinafter referred to as "the said Development Plan");

and whereas, Pimpri-Chinchwad Municipal Corporation has submitted the modification proposal for the sanction of Government *vide* letter No. नरवि/काविं/12/67/2013, dated 10th November 2013, after following the due procedure laid down under Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") as per the resolution passed by the General Body, *vide* its Resolution No. 1202, dated 20th November 2011 to initiate the modification so as to propose road widening of 45.00 mtrs. instead of 30.00 mtrs. for road which starts from Pune Alandi Road (Charoli Phata) of village Chowisawadi and going towards Charoligaon upto new S. No. 534 of Charoli village and to propose road width of 45.00 mtrs. instead of 30.00 mtrs. for road from new S. No. 517 (pt.) to new S. No. 541 (pt.) of Charoli village and accordingly modify the boundaries of reservations R. No. 2/11--Fire Station, R. No. 2/13-Telecom Center, R. No. 2/21-Shopping Center cum Market, R. No. 2/22-Parking, R. No. 2/23-Retail Market from village Chowisawadi and R. No. 2/73-Primary School, R. No. 2/61-Octroi Naka and R. No. 2/62-Cattle Shed from village Charoli and also to increase the width of 18.00 mtrs. wide road on the common village boundary of village Moshi and Dudulgaon to 30.00 mtrs. (hereinafter referred to as "the said submitted modification proposal");

and whereas, the General Body of Pimpri-Chinchwad Municipal Corporation has now passed the resolution, *vide* Resolution No. 697, dated 20th May 2015 to request the Government to reject the portion of proposal of reserving additional land area admeasuring about 1660 sq. mtrs. for Primary School of R. No. 2/73 from the said submitted modification proposal (earmarked as "ABCD" on the herewith enclosed Part Plan) of the said Development Plan and also to initiate modification proposal to delete the remaining 2340 sq. mtrs. area of reservation from R. No. 2/ 73-Primary School, adjacent to proposed 45.00 mtrs. road (earmarked as "CDEF" on the herewith enclosed Part Plan) from the said submitted modification proposal after following the due procedure laid down under Section 37 of the said Act, in the said Development Plan (hereinafter referred to as "the said Resolution");

and whereas, in the said Development Plan the land admeasuring about 2340 sq. mtrs. adjacent to proposed 45.00 mtrs. road (earmarked as "CDEF" on the herewith enclosed Part Plan) from the said submitted modification proposal from village Charoli bearing S. No. 1004 (pt.) and S. No. 1005 (pt.) which is from reservation of Primary School *vide* R. No. 2/73 (hereinafter referred to as "the said Land");

and whereas, the Municipal Corporation now intends to initiate the modification procedure as laid down under Section 37 of the said Act as per the said Resolution to delete the reservation of Primary School *vide* R. No. 2/73 from the said land and include in the surrounding Residential Zone (hereinafter referred to as "the said Modificaton");

and therefore, the copy of the said Modification is kept open for public inspection on all working days during office hours in the office of the Deputy Director of Town Planning, Pimpri-Chinchwad Municipal Corporation, Pimpri, Pune-411 018.

Any person having any Suggestions and / or Objections regarding the said Modification may file the same in writing to the Commissioner, Pimpri-Chinchwad Municipal Corporation, Pimpri, Pune-411 018 within a period of one month from

the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette.

The Suggestions and / or Objections received within the stipulated period will be considered by the Municipal Corporation before submitting the proposal to the Government of Maharashtra for sanction.

**RAJEEV JADHAV,**
Commissioner,
Pimpri-Chinchwad Municipal Corporation,
Pimpri, Pune-411 018.

Pimpri, 2nd December 2015.

---

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांजकडून

### झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

### *झोपडपट्टी निर्मूलन आदेश*

क्रमांक झोपुप्रा/तां. १/प्र.क्र. १०/झोनिआ-८३/२०१६.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे "उपरोक्त अधिनियम" असा करण्यात येत आहे) चे कलम ३-अ *(१), (२)* अन्वये पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्रमांक झोपुयो-२००४/प्र. क्र. २१३/झोपसु-१, दिनांक ३० जून २००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे ;

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३-ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक १ डिसेंबर २००५ रोजी अंतिमतः प्रसिद्ध करण्यात आलेली आहे ;

ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमातील तरतुदींनुसार अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. कितीवर्धन डेव्हलपर्स ॲन्ड बिल्डर्स यांनी ऑर्किटेक्ट ओंकार असोसिएट्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव प्रस्तावित करणेत आला आहे ;

उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी सर्व्हे नंबर ४६ पैकी, ४७ पैकी, सि.स.न. १७२१, १७२३ ते १७२७, कोथरूड, श्रावणधारा, पुणे येथील पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करून उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली आहे. सदर अंतिम यादीच्या (परिशिष्ट-२) गोषवाऱ्याचे अवलोकन करता सदर मिळकतीवर एकूण ५९० झोपड्या असून त्यापैकी पात्र निवासी ३९२, पात्र बिगर निवासी ३ व संयुक्त ३ असे एकूण ३९८ झोपडीधारक पात्र ठरलेले आहेत. पात्र झोपडीधारकांपैकी ३५० झोपडीधारकांनी झोपडपट्टी पुनर्वसन राबविण्यासाठी संमती दिलेली आहे. म्हणजेच ८७.२८ टक्के झोपडीधारकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसकास संमती दिलेली आहे.

ज्याअर्थी, पुणे शहरातील झोपडपट्टी व्याप्त क्षेत्रांसाठी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ *(क)* अन्वये पुणे शहर (नवीन व जुनी मनपा हद्द) क्षेत्रातील उक्त अधिनियमाचे (i) कलम ४ अन्वये पुणे शहरातील सर्व घोषित झोपडपट्टी क्षेत्रे आणि (ii) सार्वजनिक मिळकतीवरील गणणाकृत झोपडपट्टी क्षेत्र यासाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेमार्फत जा. क्र. झोपुप्रा/कअतां/झोपुआ/२५७/२०१४, दिनांक १० फेब्रुवारी २०१४ अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ *(क)* अन्वये आदेश एकत्रित पारित करणेत आले आहे. सदर आदेश स्थानिक वृत्तपत्रात दैनिक लोकमत व दै. सांजमहानगरी दिनांक १२ फेब्रुवारी २०१४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे व दिनांक फेब्रुवारी २० ते २६, २०१४ रोजीच्या राजपत्रात पृष्ठ २६ वर प्रसिद्ध करणेत आला आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश विहित पद्धतीने प्रसिद्ध झाला असून, विहित कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही व विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल झालेले नाही. सबब 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती/झोपड्या पाडून जमीन खुली करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, प्रकरणी दाखल मशाल संस्थेकडील सर्व्हेक्षण नकाशानुसार १२३७७.७२ चौ. मी. क्षेत्रावर सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडून सर्व्हेक्षण व अंतिम पात्रता यादी याबाबत कार्यवाही कलम ३ *(वाय)* नुसार दै. पुढारी व दै. सुराज्य दिनांक ७ फेब्रुवारी २०११ या स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर प्रकटन प्रसिद्ध करून करण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, पुणे महानगरपालिकेच्या मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून प्राप्त अहवालानुसार एकूण संपादित क्षेत्र ११७०० चौ. मी. असून त्यापैकी डी. पी. रस्त्याखालील क्षेत्र १४५९.०५ चौ. मी. व आर्थिक दुर्बल घटकांसाठी आरक्षित क्षेत्र १०२४०.९५ चौ. मी. आहे ;

आणि ज्याअर्थी, या ठिकाणच्या झोपडपट्टीतील सर्व पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन प्रकल्पात होणेकामी निर्मूलनासाठी एकूण झोपडपट्टी व्याप्त क्षेत्र १२३७७.७२ चौ. मी. क्षेत्रापैकी पुणे महानगरपालिकेकडील एकूण संपादित ११७०० चौ. मी. विचारात घेण्यात आलेले आहे, आणि विकसन व बांधकाम परवानगीसाठी पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाचे अभिप्रायानुसार १०२४०.९५ चौ. मी. क्षेत्र विचारात घेण्यात आलेले आहे.

त्याअर्थी, मी, कुणाल कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे, उपरोक्त अधिनियमाचे कलम ३-ड सह १२ *(१)* अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे 'झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र' म्हणून घोषित करीत आहे. अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्रातील सर्व झोपड्या/बांधकामे हा आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ६ (सहा) आठवड्यांच्या आत पाडून टाकून जमीन खुली केली पाहिजे. सदरचा आदेश हा खालील अटींवर देणेत येत आहे.

(१) सदर आदेशापासून तीन महिन्यांच्या मुदतीच्या आत विकसकाने योजनेचे नकाशे मंजूर करून प्रत्यक्ष बांधकाम सुरू केले पाहिजे.

(२) विकसकाने योजनेचे काम चालू करणेपूर्वी विस्थापित होणाऱ्या पात्र लाभार्थींची राहणेची तात्पुरती पर्यायी व्यवस्था आवश्यक त्या सर्व सुविधांसह स्वखर्चाने केली पाहिजे.

(३) विकसकाने पुनर्वसन घटकाच्या इमारतींचे बांधकाम दोन वर्षांत पूर्ण केले पाहिजे.

(४) इमारतींचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व इमारतींस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर एक महिन्यात विकसकाने सदनिकांचा/गाळ्यांचा ताबा लाभार्थींना दिला पाहिजे.

(५) वाजवी व सबळ कारणांमुळे इमारतींच्या बांधकामास विलंब झालेस मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे निदेशानुसार विलंब कालावधीसाठी दंड आकारून मुदतवाढ देण्यात येईल.

(६) विकसकाने योजनेच्या बांधकामाची गुणवत्ता राखण्यात कसूर केल्यास अगर बांधकामाची प्रगती समाधानकारक नसलेस, विकसकावर उपरोक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कारवाई करण्यात येईल.

(७) पात्र लाभार्थ्यांना पुनर्वसन योजनेतील सदनिकांचा/गाळ्यांचा ताबा दिलेनंतर एक महिन्यात विकसकाने संक्रमण शिबिर रिकामे केले पाहिजे.

(८) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमावलीनुसार योजनेअंतर्गत आवश्यक ती सर्व कामे विकसकाने करणे बंधनकारक राहील.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ४ (चार) आठवड्यांच्या आत उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह १२ *(४)* अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र |
|---|---|
| १ | २ |
| | चौ. मी. |
| स. नं. ४६ पैकी, ४७ पैकी, सि.स.नं. १७२१, १७२३ ते १७२७, कोथरुड, श्रावणधारा. | ११७००.०० |

### चतु:सीमा

पूर्वेस.-- नगर भूमापन क्रमांक १७२९ ते १७३१.

पश्चिमेस.--नगर भूमापन क्रमांक १६९२, १६९३, १७०१, १७०८, १७२४.

उत्तरेस.--नगर भूमापन क्रमांक १७२१ व १७२२.

दक्षिणेस.--रस्ता.

सदर योजनेसंबंधीची सर्व कागदपत्रे संबंधितांना पाहणेसाठी या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. सदरचा आदेश हा माझे सही शिक्क्यानिशी देणेत आला आहे.

**कुणाल कुमार,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, १६ जानेवारी २०१६.

---

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

### *झोपडपट्टी निर्मूलन आदेश*

क्रमांक झोपुप्रा/तां. १/प्र.क्र. ६६/झोनिआ-८७/२०१६.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे "उपरोक्त अधिनियम" असा करण्यात येत आहे) चे कलम ३-अ *(१), (२)* अन्वये पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्रमांक झोपुयो-२००४/प्र. क्र. २१३/झोपसु-१, दिनांक ३० जून २००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे ;

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३-ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक १ डिसेंबर २००५ रोजी अंतिमतः प्रसिद्ध करण्यात आलेली आहे ;

ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमातील तरतुदींनुसार अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. संजीवणी शेल्टर्स यांनी ऑर्किटेक्ट सतिश सस्ते यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव प्रस्तावित करणेत आला आहे ;

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने या जागेवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करून झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२), कॅडेस्ट्रीयल नकाशा प्रमाणित करून उपायुक्त तथा सक्षम प्राधिकारी वि.का.क्र. ३, पुणे महानगरपालिका यांनी दिनांक २ डिसेंबर २०१० अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयास सादर केलेली आहे. सदर अंतिम यादीच्या गोषवाऱ्याचे अवलोकन करता सदर मिळकतीवर एकूण २८६ झोपड्या

असून त्यापैकी पात्र निवासी झोपड्यांची संख्या २३३, पात्र बिगर निवासी झोपड्यांची संख्या ५ तसेच पात्र संयुक्त झोपड्यांची संख्या ५ असे एकूण २४३ झोपडीधारक पात्र ठरलेले आहेत. पात्र झोपडीधारकांपैकी ७० टक्केपेक्षा जास्त झोपडीधारकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसकास संमती दिलेली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ *(क), (१)* मधील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे कार्यालयाकडील आदेश क्र. झोपुप्रा/कअतां/झोपुआ/२५७/२०१४, दिनांक १० फेब्रुवारी २०१४ अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी, दिनांक १२ फेब्रुवारी २०१४ रोजीच्या दैनिक लोकमत व दै. सांजमहानगरी दिनांक १२ फेब्रुवारी २०१४या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आला आहे व दिनांक फेब्रुवारी २० ते २६, २०१४ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या पुणे विभागीय पुरवणी, भाग-१ राजपत्रात पृष्ठ २६ वर प्रसिद्ध करणेत आला आहे व दिनांक २ मे २०१४ रोजी सदर आदेश झोपडपट्टी क्षेत्रातील जागेवर डकविण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश विहित पद्धतीने प्रसिद्ध झाला असून, विहित कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही व विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल झालेले नाही. सबब 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती/झोपड्या पाडून जमीन खुली करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, कुणाल कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे, उपरोक्त अधिनियमाचे कलम ३-ड सह १२ *(१)* अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र हे 'झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र' म्हणून घोषित करीत आहे. अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्रातील सर्व झोपड्या/बांधकामे हा आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ६ (सहा) आठवड्यांच्या आत पाडून टाकून जमीन खुली केली पाहिजे. सदरचा आदेश हा खालील अटींवर देणेत येत आहे.

(१) सदर आदेशापासून तीन महिन्यांच्या मुदतीच्या आत विकसकाने योजनेचे नकाशे मंजूर करून प्रत्यक्ष बांधकाम सुरू केले पाहिजे.

(२) विकसकाने योजनेचे काम चालू करणेपूर्वी विस्थापित होणाऱ्या पात्र लाभार्थींची राहणेची तात्पुरती पर्यायी व्यवस्था आवश्यक त्या सर्व सुविधांसह स्वखर्चाने केली पाहिजे.

(३) विकसकाने पुनर्वसन घटकाच्या इमारतींचे बांधकाम दिलेल्या कालावधीत पूर्ण केले पाहिजे.

(४) इमारतींचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व इमारतींस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर एक महिन्यात विकसकाने सदनिकांचा/गाळ्यांचा ताबा लाभार्थींना दिला पाहिजे.

(५) वाजवी व सबळ कारणांमुळे इमारतींच्या बांधकामास विलंब झालेस मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे निदेशानुसार विलंब कालावधीसाठी दंड आकारून मुदतवाढ देण्यात येईल.

(६) विकसकाने योजनेच्या बांधकामाची गुणवत्ता राखण्यात कसूर केल्यास अगर बांधकामाची प्रगती समाधानकारक नसलेस, विकसकावर उपरोक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कारवाई करण्यात येईल.

(७) पात्र लाभार्थ्यांना पुनर्वसन योजनेतील सदनिकांचा/गाळ्यांचा ताबा दिलेनंतर एक महिन्यात विकसकाने संक्रमण शिबिर रिकामे केले पाहिजे.

(८) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमावलीनुसार योजनेअंतर्गत आवश्यक ती सर्व कामे विकसकाने करणे बंधनकारक राहील.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ४ (चार) आठवड्यांच्या आत उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह १२ *(४)* अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

**अनुसूची**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र |
|---|---|
| १ | २ |
| | चौ. मी. |
| टी.पी.एस. क्रमांक ३, फा.प्लॉ. क्रमांक ४७-अ, सि.स.नं. १०७७, शुक्रवार पेठ, हिराबाग, पुणे. | २८७३.०० |

**चतु:सीमा**

पूर्वेस.-- रस्ता.
पश्चिमेस.--रस्ता.
उत्तरेस.--सि.स.न्नं. १०४० ते १०४४.
दक्षिणेस.--रस्ता.

सदर योजनेसंबंधीची सर्व कागदपत्रे संबंधितांना पाहणेसाठी या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. सदरचा आदेश हा माझे सही शिक्क्यानिशी देणेत आला आहे.

**कुणाल कुमार,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, १८ जानेवारी २०१६.

---

## अध्यक्ष, नगरपरिषद यांजकडून

## बारामती नगरपरिषद, बारामती

*महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ बारामती शहराची वाढीव हद्द क्षेत्राची प्रारूप विकास योजना.*

***अधिसूचना***

क्रमांक बानप/कार्या-१४/प्र.वि.यो./१०३/२०१६.--बारामती नगरपरिषदेने तिच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक ८०, दिनांक २४ ऑगस्ट २०१३

अन्वये बारामती शहराच्या नगरपरिषदेच्या वाढीव हद्द क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्याचा इरादा, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३८ व २३ *(१)* अन्वये जाहीर केला आहे. ह्याकरिता मा. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचे पूर्व संमतीने बारामती नगरपरिषदेने नेमलेल्या नगर रचना अधिकारी यांनी वरील वाढीव हद्द क्षेत्राची विकास योजनासंबंधी सर्व प्रकारचे सर्वेक्षण पूर्ण करून विकास योजनेचा प्रारूप आराखडा बारामती नगरपरिषदेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर केलेला आहे.

या सूचनेद्वारे असे जाहीर करण्यात येते की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ *(१)* अन्वये दिनांक २३ जानेवारी २०१६ रोजीच्या नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक १३१ अन्वये उपरोक्त प्रारूप विकास आराखडा प्रसिद्ध केला आहे. या योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कार्यालयीन वेळेत कामकाजाचे दिवशी जनतेस अवलोकनार्क, बारामती नगरपरिषद कार्यालयात खुले ठेवले आहेत. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६ *(२)* मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर प्रारूप विकास योजनेच्या तपशिलाच्या प्रती अथवा प्रमाणित उतारे योग्य त्या किंमतीत नगरपरिषदेकडे उपलब्ध होऊ शकतील.

वरील विकास योजनेतील तरतुदीसंबंधी कोणाच्या काही सूचना अगर हरकती असल्यास त्या त्यांनी ही अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० (तीस) दिवसांचे मुदतीत बारामती नगरपरिषदेकडे लेखी सादर कराव्यात म्हणजे अशा मुदतीत आलेल्या सूचना व हरकतीचा बारामती नगरपरिषद सदरहू प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमांचे कलम ३० अन्वये महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यापूर्वी आवश्यक तो विचार करील.

**सुभाष सोमाणी,**
अध्यक्ष,
बारामती नगरपरिषद, बारामती.

बारामती, २५ जानेवारी २०१६.

---

## BARAMATI MUNICIPAL COUNCIL, BARAMATI

*Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 Draft Development Plan of Baramati Extented Limit.*

### *Notice*

No. BMC/Karya-14/103/2016.––Baramati Municipal Council by it's Resolution No. 80, dated 24th August 2013 declared it's intention to prepare the Development Plan of Baramati Extended Limit for the area within the Municipal limits under the provision of Section 38 read with 23 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. The Town Planning Officer has appointed by the Baramati Municipal Council with prior approval of the Joint Director of Town Planning Officer has after carrying out all kinds of surveys, prepared and submitted the Draft Development Plan of Baramati to the Baramati Municipal Council.

The notice is hereby given as required under Section 26 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 that the Draft Development Plan is now published by Municipal Council *vide* the there Resolution No. 131, dated 23rd January 2016 in the manner laid down under Section 26 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 copy of said Draft Development Plan and it's report there on are kept open for inspection of the public at the office of Baramati Municipal Council on any working day during the office hours.

Copies of extracts or the Draft Development Plan and particulars mentioned in Section 26 *(2)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 or certified extracts there form shall be available for the sale to the public at reasonable price.

If within 30 (Thirty) days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette any person communicates in writing any suggestion or objections relating to this plan, the Baramati Municipal Council could consider the same before submitting the said plan to Government for Section under Section 30 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

**SUBHASH SOMANI**,
President,
Baramati Municipal Council,
Baramati.

Baramati, 25th January 2016.

---

**अध्यक्ष जिल्हापरिषद यांजकडून**

**सातारा जिल्हा परिषद, सातारा (ग्रामपंचायत विभाग), सामान्य प्रशासन विभाग-२**

*महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये.*

### *नोटीस*

क्रमांक ग्राप-८/कावि-३०२/२०१५.--सातारा जिल्ह्यातील विशेषत: कोरेगाव तालुक्यातील कोरेगाव ग्रामपंचायत हद्दीतील सर्व नागरिकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी, कोरेगाव, तालुका कोरेगाव, जिल्हा सातारा या बिगर नगर परिषद शहराची विकास योजना

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार शासनाची अधिसूचना क्रमांक वि.यो. कोरेगाव/८७/८३/टीपीव्ही/२-५११, दिनांक २३ जानेवारी १९८९ ने मंजुरी दिली असून ती दिनांक १ मार्च १९८९ पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर विकास योजनेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे फेरफार करणेकरिता सर्व्हे नंबर ४६६ (जुना ५७०) वरील बगीचा व सर्व्हे नंबर ४७१-अ, जुना ५७३/अ/१-अ वरील ग्रीन झोन उठविणेकामी कोरेगाव ग्रामपंचायतीने तिच्या मासिक सभा दिनांक २१ जानेवारी २०१५, ठराव क्रमांक ३ *(२)* २ अन्वये मान्यता दिलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, कोरेगाव, तालुका कोरेगाव, जिल्हा सातारा या बिगर नगर परिषद शहराची व ग्रामपंचायत हद्दीतील विकास योजना नियोजन प्राधिकरण म्हणून जिल्हा परिषद साताराचे अधिपत्याखालील कार्यक्षेत्रातील असलेने सातारा जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने तिच्या दिनांक १६ जुलै २०१५ चे सभेतील ठराव क्रमांक ४५० ने जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन प्रस्ताव शासनास सादर करणेकामी मान्यता दिलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक ९ सप्टेंबर २०१५, ठराव क्रमांक ४०१ अन्वये विकास योजनेमधील मंजुरीचा निर्णय घेतलेला आहे. तो खालीलप्रमाणे आहे.

**मंजूर विकास योजनेमधील प्रस्ताव**

| अ. नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | | हे. आर |
| १ | सर्व्हे नंबर ४६६ (जुना ५७०) | ० २८ |
| २ | सर्व्हे नंबर ४७१-अ (जुना ५७३-अ/१-अ) | ० ९४.३ |

आरक्षण क्रमांक १ ची जागा बगीच्यासाठी आरक्षित आहे.

आरक्षण क्रमांक २ ची जागा शेती विभागात समाविष्ट आहे.

**प्रस्तावित सुधारणा**

| अ. नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | | हे. आर |
| १ | सर्व्हे नंबर ४६६ (जुना ५७०) | ० २८ |
| २ | सर्व्हे नंबर ४७१-अ (जुना ५७३-अ/१-अ) | ० ९४.३ |

आरक्षण क्रमांक १ चे बगीचाचे आरक्षण वगळणे.

आरक्षण क्रमांक २ ची जागा शेती विभागातून वगळणे.

ज्याअर्थी, उक्त फेरफार करण्याचे नकाशे कोरेगाव ग्रामपंचायत कार्यालय व नियोजन प्राधिकरण म्हणून सातारा जिल्हा परिषद, साताराचे ग्रामपंचायत विभागात सर्व नागरिकांना (रविवार व शासकीय सुट्टीचे दिवस सोडून) कार्यालयीन वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त वापर बदलाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार करावयाची प्राथमिक कार्यवाही नियोजन प्राधिकरण या नात्याने सातारा जिल्हा परिषद, सातारा यांनी करणे आवश्यक असल्याने सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील विशेषत: कोरेगाव ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांच्या हरकती/सूचना मागविणे त्याची चौकशी करून निर्णय घेणे इत्यादीबाबीसाठी प्राधिकृत करणेत आलेले आहे.

त्याअर्थी, सर्व संबंधितांना विनंती करणेत येते की, उक्त जागा वापर बदलाबाबत आपल्या सूचना/हरकती ही सूचना प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. सदर सूचना प्रसिद्ध दिनांकापासून ३० (तीस) दिवसांच्या आत कोणाकडूनही नियोजित फेरबदलाबाबत सूचना हरकती/प्राप्त न झाल्यास नियोजन प्राधिकरण या नात्याने सातारा जिल्हा परिषद तिचे सर्वसाधारण सभेमध्ये उक्त वापर बदलास अंतिमत: मंजुरी देऊन परिपूर्ण प्रस्ताव शासनाचे नगर विकास खात्याकडे मंजुरीकामी विहित मार्गाने सादर करील. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही सूचना/हरकती याची दाखल घेण्यास नियोजन प्राधिकरण म्हणून सातारा जिल्हा परिषद बाध्य असणार नाही.

**माणिकराव विठ्ठल सोनवलकर,**

अध्यक्ष,

सातारा जिल्हा परिषद, सातारा.

सातारा, ३० ऑक्टोबर २०१५.

---

## SATARA ZILLA PARISHAD, SATARA

*Under Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.*

***General Notice***

क्रमांक ग्राप-८/कावि-३०२/२०१५.—All Citizens residing in Satara District, Koregaon, taluka and especially in and around the vicinity of Koregaon Grampanchayat are hereby informed by this public Notice that, Whereas, the Government in Town Planning Department has duly sanctioned and approved the Development Scheme of village Koregaon, taluka Koregaon, district Satara *vide* its Notification No. DP/Koregaon/78-83/TPV-2/511, dated 23rd January 1989 and which has come into force on 1st March 1989 ;

and whereas require change in the Development Plan in respect of S. No. 466 (Old 570 ) and S. No. 471-A (Old 573/A/1-A) has already been resolved by the Koregaon Grampanchayat Monthly meeting Resolution No. 3 *(2)* 2, dated 21st January 2015 ;

and whereas, the said change in use of land is coming under the Non Municipal area and being in the area of the Grampanchayat which comes under the Planning Authority of Zilla Parishad, Satara, the Zilla Parishad has also Resolved *vide* its standing committee's Resolution No. 450, dated 16th July 2015 recommending the said change in use of land for proper sanction to the Government through General Body of Planning Authority's to that effect ;

and whereas, the Planning Authorities has Resolved throuth its General Body Resolution No. 401, dated 9th September 2015 and duly sanctioned and approved the change in the use of land for further approved and sanction of the Government in Town Planning Department, Maharashtra State which is as follow.—

**Sanctioned Development Plan**

| Sr. No. | S. Nos. | Area |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| | | H. R. |
| 1 | S. No. 466 (Old 570) | 0 28 |
| 2 | S. No. 471-A (Old 573-A/1-A) | 0 94.3 |

Sr. No. 1 at present reserved for "Garden".

Sr. No. 2 at present reserved for "Agricultural Zone".

**Modified Proposed**

| Sr. No. | S. Nos. | Area |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| | | H. R. |
| 1 | S. No. 466 (Old 570) | 0 28 |
| 2 | S. No. 471-A (Old 573-A/1-A) | 0 94.3 |

Sr. No. 1 proposed for "Residential Zone".

Sr. No. 2 proposed for "Non Agricultural Zone".

and whereas, the Plan showing the proposed modification is kept open with the Grampanchayat Karyalaya, Koregaon, taluka Koregaon and at Grampanchayat vibhag at district Head Quarter of Planning Authority *i. e.* Zilla Parishad for observation on every working day during office hours except every Sunday and Government holiday ;

and whereas, the Satara Zilla Parishad is duly authorised as Planning Authority under Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for inviting suggestions/ objections, hear them and decide etc.

It is hereby published and requested that the Citizens especially, residing in and around the vicinity of Koregaon Grampanchayat of Koregaon taluka, Satara district to send their suggestions/ objections, if any, to the under signed within 30 (thirty) days from the publication of this notice enabling the Zilla Parishad to resolve the final resolution and onward transmission to the respective authorities, Suggestions/ objections, received after the prescribed time limit of 30 (thrity) days will not be entertained.

**MANIKRAO VITTHAL SONAWALKAR**,

President,

Satara Zilla Parishad, Satara.

Satara, 30th October 2015.

---

**पोलीस उपआयुक्त यांजकडून**

**आदेश**

क्रमांक पोउआ/वाहतूक/३/२०१६.– ज्याअर्थी, पुणे शहरातील खालील ठिकाणी वाहतूक सुरक्षित व सुरळीतपणे चालणे इष्ट आहे, त्याअर्थी, महाराष्ट्र शासन, गृह विभाग क्रमांक एमव्हीए-०१९६/८७१/सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७ सप्टेंबर १९९६ चे नोटिफिकेशननुसार मोटार वाहन कायदा, कलम ११५, ११६ *(१), (ए), (बी),* ११६ *(४)* आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून तसेच प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून मी, सारंग आवाड, पोलीस उपआयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायर ब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका इत्यादी) खेरीज करून खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करीत आहे. सदर ठिकाणी यापूर्वी पार्किंगबाबत असलेले निर्बंध रद्द समजण्यात येतील.

**स्वारगेट वाहतूक विभाग पुणे अंतर्गत**

सातारा रोडवरील लक्ष्मीनारायण सिनेमागृहाचे पश्चिमेकडील संपूर्ण रोडवर दोन्ही बाजूस नो-पार्किंग करण्यात येत आहे.

**सारंग आवाड,**

पोलीस उपआयुक्त,

वाहतूक शाखा, पुणे शहर, पुणे.

पुणे, ११ जानेवारी २०१६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI NARESH MAHADEORAO GOTE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006. EDITOR : SHRI NARESH MAHADEORAO GOTE.